| जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय नांदेड | |
|---|---|
| वेब साईट - www.nanded.gov.in | E-mail- nandedrdc@ gmil.com |
| Phone ०२४६२-२३५०७७ | Fax No- ०२४६२-२३८५०० शाखा - महसूल १ |
| क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१/सिआर | दिनांक ३०.०३.२०२० |

प्रति,

१) जिल्हा उपनिबंधक (सह.संस्था) नांदेड
२) प्रादेशीक अधिकारी, महा. औदयो. विकास महामंडळ, नांदेड.
३) सर्व सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती नांदेड जिल्हा
४) सहायक कामगार आयुक्त, नांदेड.
५) कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प, नांदेड
६) कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग सा.बां. विभाग, नांदेड
७) कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, जि.प., नांदेड
८) कार्यकारी अभियंता, सां.बा.विभाग, नांदेड/भोकर/देगलूर.
९) कार्यकारी अभियंता, पंतप्रधान ग्रामसंडक / मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, नांदेड

**विषयः- COVID-१९ विषाणुंचा प्रादुर्भाव- लॉकडाऊन कालावधीत बेघर, विस्थापीत कामगार, परराज्यातील अडकलेले कामगार यांच्यासाठी निवारागृह, अन्नधान्य व भोजन व्यवस्थे बाबत करावयाच्या तातडीच्या उपाययोजना**

**संदर्भः-** महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दिनांक २९.०३.२०२०

उपरोक्त विषयी लॉकडाऊन आदेशामुळे बंद झालेल्या उद्योग व्यवसायातील, साखर कारखाने, कृषी उत्पन्न बाजार समितीतील प्रभावीत झालेले कामगार, परराज्यातील विस्थापीत कामगार, यांचे स्थलांतरामुळे Lock Down व Social Distance उपाययोजनेच्या मानकाचे उल्लंघन होत आहे.त्यामुळे आपणांस निर्देशीत करण्यात येते की, आपले अधिनस्त वरील सर्व आस्थापना प्रमुखां मार्फत अशा कामगारांच्या बाबतीत खालीलप्रमाणे उपाययोजना करुन घेण्यात यावी.

१) वरील ठिकाणी असलेले कामगार हे स्थलांतरीत होणार नाहीत याद्दष्टिने आस्थापना प्रमुखांनी/रस्ते / इमारत / इतर बांधकामासाठी कामासाठी कंत्राटदाराकडील कामगार सुरक्षा रक्षक नेमावे. कामगार स्थलांतरीत होवून इतर ठिकाणी आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आस्थापना प्रमुखावर राहील.
२) कर्मचारी / कामगारांकरीता संबंधीत साखर कारखाना / आस्थापना प्रमुख / संबंधित कंत्राटदार यांनी त्यांच्या करीता आवश्यक असलेली सूविधा देण्यासाठी निवारागृहाची / भोजनाची व्यवस्था करावी.
३) अशा परिस्थितीत Social Distance उपाययोजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी.
४) तसेच त्यांची वैदयकीय तपासणी, औषोधोपचाराची आवश्यक ती काळजी घ्यावी.

या कामात दिरंगाई केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचे विरुध्द महाराष्ट्र कोव्हीड -१९ उपायोजना नियम २०२० मधील तरलुद व भारतीय दंड संहिताचे कलम १८८ नुसार कारवाईची तरतूद आहे, याचीही

Scanned by CamScanner

संबंधितांना सूचना द्यावी. तसेच सदर ठिकाणी असलेली कामगाराची माहिती दररोज आपण या कार्यालयातील समन्वय अधिकारी श्री. प्रसाद कुलकर्णी, तहसिलदार (सामान्य) (dygennanded@gmail.com) यांना कळवावी. तसेच अन्य तक्रारी/अडचणी / अधिक माहितीसाठी श्री भिंगारे, प्रादेशीक अधिकारी, महा. औद्यो. विकास महामंडळ, नांदेड मो. क्रं. ९९७५५९७७११ व श्री सय्यद मोहसीन सहायक कामगार आयुक्त, नांदेड मो. क्रं. ७२७६२१६०६ यांचेशी संपर्क साधवा.

तसेच अधिकारी / कर्मचारी यांचेकडून कामात दिरंगाई, निष्काळजीपणा केल्यास आपत्ती व्यवस्थापना अधिनियम २००५ च्या कलम ५१ व इतर अनुषंगिक कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

OFFICE OF THE COLLECTOR NANDED.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
२) पोलीस अधीक्षक, नांदेड
३) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
४) तहसिलदार (सामान्य), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
५) तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

Scanned by CamScanner